# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
## भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं. : ०२२ – २४०९३११०
०२२ – २४०३१४९८
फॅक्स क्र : ०२२ – २४०९३११०
www.cpfmseb.2011@gmail.com
website : www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
भविष्य निर्वाह निधी विभाग,
धारावी रोड, माटुंगा (पू) मुंबई ४०० ०१९.


क्र.लेवि/भनिनि /कनिवेयो/डी/ 6995 दिनांकः - 9 NOV 2016

## परिपत्रक क्र-१९५ (अ)

**विषय :- "कर्मचारी निवृत्ती वेतन योजना १९९५" चे निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) सुधारीत पडताळणी यादी (Revised Checklist) नुसार भ.नि.नि. कार्यालयास सादर करणे बाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १९५ दि. १३.०१.२०१५**

कर्मचारी सेवानिवृत्त / मृत्यु अथवा राजीनामा दिल्यानंतर निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) सादर करणे सुलभ व्हावे म्हणून या कार्यालयाने पडताळणी यादी उपलब्ध करून दिली असतांनाही बरेच निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) परिपूर्ण नसल्यामुळे त्रुटींची पुर्तता करण्याकरिता परत पाठविले जात आहेत. ही बाब निदर्शनास आल्यामुळे सदरील पडताळणी यादीमध्ये सुधारणा करून सुधारित पडताळणी यादी (Revised Checklist) भ.नि.नि. कार्यालयाने सोबत उपलब्ध करून दिली आहे.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) सादर करते वेळी सोबत जोडलेल्या सुधारीत पडताळणी यादी (Revised Checklist) नुसार कागदपत्रांची तपासणी करून पुर्तता करावी व सुधारीत पडताळणी यादीसह निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) या कार्यालयास सादर करावेत. सुधारीत पडताळणी यादी नुसार प्रस्ताव सादर न झाल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामांस संबधीत कार्यालय सर्वस्वी जबाबदार असतील. याची कृपया नोंद घ्यावी.

हे परिपत्रक महानिर्मिती/महापारेषण/महावितरण कंपनींच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

राम पवार

सचिव
म.रा.वि.मं., भ.नि.नि. विश्वस्त मंडळ
माटुंगा मुंबई - १९.

सहपत्रः- सुधारीत पडताळणी यादी.

१.ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सोडली आहे, अशा कर्मचा-यां-यासाठी.
२.जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.
३.जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी.
४.संपुर्ण नावात बदल असल्यास त्याबाबत भरावयाचे प्रपत्र.

प्रतः- प्रेषण यादीप्रमाणेः-
महानिर्मिती/महापारेषण/महावितरण

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, भविष्य निर्वाह निधी विभाग

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा (पूर्व) मुंबई- १९

## नमुना क्र.१० - क सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

**( ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडली आहे, अशा कर्मचा-यांसाठी.)**

| | होय | नाही |
|---|---|---|
| १. नमुना क्र. १० क अर्जाचे दोन संच (मुळ प्रतीत ) खाडाखोड न करता सुवाच्छ अक्षरात भरलेले आहेत का ? (खाडाखोड असल्यास पेन्शन प्रस्ताव परत पाठविण्यात येतील.) | ------ | ------ |
| २. सभासदाचा पेन्शन प्रस्ताव सादर करताना संपुर्ण प्रस्तावात सभासदाचे पुर्ण नाव व जन्मतारीख एकसारखी असल्याची खात्री करुन पेन्शन प्रस्ताव सादर केला आहे का ? | ------ | ------ |
| ३. सभासदाच्या (अर्जदाराच्या) जन्मदाखल्याच्या/शाळा सोडण्याच्या दाखल्याच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ४. सभासदाचे (अर्जदाराचे) सेवापुस्तीकेतील पहिल्या पानाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ५. सभासदाचा (अर्जदाराचे) स्वतंत्र बँक खाते नमुना क्र.१० क मध्ये नमुद करून खाते पुस्तीकेच्या पहिल्या पानाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ६. नमुना क्र.१० क मध्ये नमुद केलेल्या बँकेचा रद्द केलेला (Cancel) धनादेश (Cheque) जोडला आहे का ? | ------ | ------ |
| ७. सभासदाचे (अर्जदाराचे) पासपोर्ट आकाराचे तीन रंगीत छायाचित्राच्या (Photo) मागे सभासदाचा क.नि.वे.क्र. नमुद करून सक्षम अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी जोडले आहे का ? | ------ | ------ |
| ८. सभासद क.नि.वे.यो.चा सभासद झाल्यापासून ते सेवा समाप्ती / निवृत्तीच्या दिनांकापर्यंतचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? | ------ | ------ |
| ९. सभासदाची डिसें. १९९५ पर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज आणि जानेवारी १९९६ पासून सभासदाच्या सेवासमाप्ती पर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज बिनपगारी रजेच्या तक्त्यात वेगवेगळी दाखविली आहे का ? | ------ | ------ |
| १०.सभासदाच्या स्वेच्छानिवृत्ती होण्याआधीच्या १२ महिन्याच्या पगाराचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षित करून जोडला आहे का? (पगाराचा तपशिल महिनावार क.नि.वेच्या कपात व रोख प्रमाणक क्र. व दिनांकासह लेखापरिक्षित करून सादर करावा) | ------ | ------ |

## नमुना क्र.१० - क सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

( ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडली आहे, अशा कर्मचा-यांसाठी.)

| | होय | नाही |
|---|---|---|
| ११. सभासदाच्या स्वेच्छानिवृत्ती होण्याआधीच्या १२ महिन्याच्या कालावधीत एकत्रित पुरवणी पगार दिला गेला असल्यास त्याचे महिनावार विवरण पत्र क.नि.वे. कपातीसह लेखापरिक्षित करून जोडले आहे का? | ------ | ------ |
| १२. ज्या सभासदाना ३० सप्टेंबर २०१४ नंतर व त्याच दिवशी राजीनामा / सेवेतून बडतर्फ कले असेल तर त्या तारखेपासून अगोदर ६० महीन्याचा वेतनाचा तपशिल सादर करावा. (सदर वेतनाचा तपशिल महीनावार क.नि.वे. च्या कपात व रोख प्रमाणक क्र. व दिनांकासह लेखापरिक्षित करून सादर करावा) तसेच ६० महीन्याच्या कालावधीत सभासदाचा पुरवणी पगार अदा केला असल्यास त्याचे महीनावार विवरणपत्र क.नि.वे. कपातीसह लेखापरिक्षित करून सादर केले आहे का ? | ------ | ------ |
| १३. नमुना क्र १० क मधील रकाना क्र.१२ वर सभासदाने (अर्जदाराने) स्वाक्षरी केली आहे का ? | ------ | ------ |
| १४. सभासदाने (अर्जदाराने) नोकरी सोडण्याआधीच्या दोन वर्ष कालावधीचा बिन पगारी रजा मंजुरीचा कार्यालयीन आदेश जोडला आहे का ? | ------ | ------ |
| १५. सभासदाच्या (अर्जदाराच्या ) नावात तफावत असल्यास त्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राची प्रत (Gazzet) जोडली आहे का ? | ------ | ------ |
| १६. नमुना क्र. १० क अर्जातील रकाना क्र.१३ मध्ये रेव्हेन्यू स्टँप लावून त्यावर सभासदाने (अर्जदाराने) सही केली आहे का ? | ------ | ------ |
| १७. स्वेच्छा निवृत्ती /बडतर्फ असणा-या सभासदाने (अर्जदाराने) स्वेच्छा निवृत्ती घेतल्याचा/बडतर्फ केल्याचा कार्यालयीन आदेश सांक्षांकीत करून दोन प्रतीत जोडला आहे का ? | ------ | ------ |
| १८. नमुना क्र. १० क अर्जावर सभासदाचा (अर्जदाराचा) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक नमुद केला आहे का ? | ------ | ------ |
| १९. नमुना क्र.१० क मधील रकाना क्र.८ मध्ये आवश्यक माहिती नमुद केली आहे का ? | ------ | ------ |
| २०. नमुना क्र.१० क व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड असल्यास त्या ठिकाणी सभासदाने (अर्जदाराने) स्वाक्षरी केली आहे का ? | ------ | ------ |

## नमुना क्र.१० - क सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

( ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडली आहे, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

| | होय | नाही |
|---|---|---|
| २१. सभासदाने (अर्जदाराने) नमुना क्र. १० क चा प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रस्तावाची हाताळणी करतांना बरेचदा नमुना क्र.१० क चा अर्ज जीर्ण झालेला असतो अशावेळी नविन अर्ज भरला जातो परंतू प्रस्तावासोबत जुना नमुना क्र.१० क अर्ज जोडला जात नाही. तरी दोन्हीही नमुने (जुना नमुना क्र. १० क व नविन नमुना क्र.१० क) प्रस्तावासोबत जोडले आहेत का ? | ------ | ------ |
| २२. पेन्शन प्रकरण पाठविण्यास ६ महिन्यापेक्षा जास्त विलंब झाला असल्यास कार्यालयाने व सभासदाने त्याचे सविस्तर स्पष्टीकरण जोडले आहे का ? | ------ | ------ |
| २३. नमुना क्र.१० क सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसणा-या प्रत्येकी दोन साक्षांकित प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |

---

<u>अत्यंत महत्वाची सुचना</u>

नमुना क्र. १० क अर्जासोबत जोडलेल्या चेकलिस्ट नुसार पेन्शन प्रस्ताव प्रमाणीत करून या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. तसेच या चेकलिस्ट व्यतिरीक्त क्षेत्रिय भ.नि.नि. आयुक्त कार्यालय, बांद्रा (पूर्व) मुंबई ५१ यांनी दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करणेस कर्मचारी/कार्यालयास बंधनकारक राहील. चेकलिस्टसह त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव न पाठविल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामास संबंधीत कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

२।७।५४।८

सचिव
म.रा.वि.मं., भ.नि.नि. विश्वस्त मंडळ
माटुंगा मुंबई - १९.

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,भविष्य निर्वाह निधी विभाग

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा (पूर्व) मुंबई-१९

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

**(जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)**

---

| | होय | नाही |
|---|---|---|
| १. नमुना क्र. १० ड अर्जाचे दोन संच (मुळ प्रतीत ) खाडाखोड न करता सुवाच्छ अक्षरात भरलेले आहेत का ? (खाडाखोड असल्यास पेन्शन प्रस्ताव परत पाठविण्यात येतील.) | ------ | ------ |
| २. सभासदाचा पेन्शन प्रस्ताव सादर करताना संपुर्ण प्रस्तावात सभासदाचे पुर्ण नाव व जन्मतारीख एकसारखी असल्याची खात्री करुन पेन्शन प्रस्ताव सादर करावा. | ------ | ------ |
| ३. सभासदाच्या जन्मदाखल्याच्या / शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ४. सभासदाच्या सेवापुस्तीकेतील पहिल्या पानाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ५. क्षेत्रिय भविष्य निधी कार्यालयाने निर्देशित केलेल्या कोणत्याही एका बँकेत सभासदांचे व पत्नीचे स्वतंत्र पेन्शन खाते उघडून पेन्शन बँकखाते पुस्तिकेतील पहिल्या पानाच्या सुस्पष्ट दिसणा-या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? (SBI Bank, Bank of India, Axis Bank, ICICI Bank, HDFC Bank,Punjab National Bank) | ------ | ------ |
| ६. नमुना क्र. १०ड मधील रकाना क्र.१२ मध्ये फक्त वय वर्ष २५ च्या आतील अपत्यांचाच उल्लेख करुन त्यांच्या जन्म प्रमाणपत्राच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ७. सभासद व त्याच्या पत्नी / पती यांचे पासपोर्ट आकाराचे रंगीत एकत्रित छायाचित्र ( Group Photo) व स्वतंत्र छायाचित्र (Photo) प्रत्येकी तीन छायाचित्रांच्या मागे सभासदाचा क.नि.वे क्र. नमुद करून सक्षम अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी जोडले आहेत का ? | ------ | ------ |
| ८. सभासद क.नि.वे.यो.चा सभासद झाल्यापासून ते निवृत्ती दिनांकापर्यंतचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? | ------ | ------ |
| ९. सभासदाची डिसेंबर-१९९५ पर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज आणि जानेवारी -१९९६ पासून सभासदाच्या सेवासमाप्तीपर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज बिनपगारी रजेच्या तक्त्यात वेगवेगळी दाखविलेली आहे का ? | ------ | ------ |
| १०. सभासद रोजंदारी कामगार (NMR) असल्यास त्याचा रोजंदारी कामगार असल्यापासूनचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? | ------ | ------ |

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

### (जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

होय नाही

११.सभासदाची वयाची ५८ वर्षे पूर्ण होण्याआधीच्या १२ महिन्यांचा पगाराचा तपशिल दर्शविणारा तक्ता लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? (पगाराचा तपशिल महिनावार क.नि.वे.च्या कपात व रोख प्रमाणक क्र. व दिनांकासह लेखा परिक्षीत करून सादर करावा) ------ ------

१२. सभासदाच्या वयाच्या ५८ वर्षे पूर्ण होण्याआधीच्या १२ महिन्यांच्या कालावधीत एकत्रित पुरवणी पगार दिला गेला असल्यास त्याचे महिनावार विवरणपत्र क.नि.वे.कपातीसह लेखापरिक्षीत करून जोडले आहे का ? ------ ------

१३. ज्या सभासदाना ३० सप्टेंबर २०१४ नंतर व त्याच दिवशी राजीनामा / सेवेतून बडतर्फ / वयाची ५८ वर्षे पुर्ण होऊन सेवानिवृत्त होत असतील तर त्या तारखेपासून अगोदर ६० महीन्याचा वेतनाचा तपशिल सादर करावा. (सदर वेतनाचा तपशिल महीनावार क.नि.वे. च्या कपात व रोख प्रमाणक क्र. व दिनांकासह (C.V. No. & Date) लेखापरिक्षित करून सादर करावा) तसेच ६० महीन्याच्या कालावधीत सभासदाचा पुरवणी पगार अदा केला असल्यास त्याचे महीनावार विवरणपत्र क.नि.वे. कपातीसह लेखापरिक्षित करून सादर करावे. ------ ------

१४. नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.१७ वर सभासदाने स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

१५. नमुना क्र.१० ड मधील नमुना हस्ताक्षर प्रपत्रावर सभासदाने एकूण १० स्वाक्ष-या केल्या आहेत का ? आणि सक्षम अधिका-यांचे साक्षांकन केले आहे का ? ------ ------

१६. सभासदाने नमुना क्र. १० ड मधील रकाना क्र. ८ अ मध्ये वयाची ५० वर्षे पुर्ण झाल्याच्या तारखेची नोंद केली आहे का ? ------ ------
(फक्त स्वेच्छानिवृत्त व बडतर्फ कर्मचा-यांसाठी)

१७. सभासद वयाची ५८ वर्षे पूर्ण होण्याआधीच स्वेच्छानिवृत्त / बडतर्फ झाला असल्यास व पेन्शन प्रकरण सादर करण्यास उशिर होउन वयाची ५८ वर्षे पूर्ण झाली असल्यास नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.०२ मध्ये "वार्धक्य निवृत्ती वेतन " असे नमुद केले आहे का ? ------ -------

१८.सभासदास भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास खालील रकाने भरले आहेत का? ------ ------
(दि. २६सप्टेबर २००८ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाच लागू.)
(पत्नीला भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास रकाना क्र.१०मधील क्र.१ किंवा क्र.३ हा पर्याय निवडून रकाना क्र.११ मध्ये पत्नीचे नामनिर्देशन नमुद करावे. सभासदाची (अर्जदाराची) पत्नी/पती हयात असल्यास व अपत्यांस भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास रकाना क्र. १० मधील क्र. २ हा पर्याय निवडून रकाना क्र. ११ मध्ये अपत्यांचे नामनिर्देशन करावे. तसेच सभासदाची (अर्जदाराची) पत्नी/पती हयात नसल्यास व अपत्यांस भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास रकाना क्र.१० मधील क्र.३ चा पर्याय निवडून रकाना क्र.११ मध्ये अपत्यांचे नामनिर्देन करावे.)

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

(जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

| | होय | नाही |
|---|---|---|
| १९. सभासदाच्या मृत्युनंतर वारसाला भांडवल परतावा मिळत असल्यामुळे नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.९,१०,११ भरला आहे का ? (दि .२६सप्टेबर २००८ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाच लागू.) | ------ | ------ |
| २०. नमुना क्र. १० ड मधील रकाना क्र.९,१०,११ हा ऐच्छिक पर्याय खाडाखोड न करता योग्य प्रकारे भरला जाणे आवश्यक आहे. खाडाखोड झाल्यास सभासदाने स्वाक्षरी केली आहे का ? (दि.२६ सप्टेबर २००८ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाच लागू.) | ------ | ------ |
| २१. सभासदाचे नावात तफावत असल्यास महाराष्ट्र शासनाचे राजपत्र (Gazzet) सादर करावे व नमुना क्र. १० ड मधील हस्ताक्षर नमुना नविन नावाने सादर करावा व नविन नावानेच बँक खाते उघडले आहे का ? यासंदर्भात ख-या नावासाठी द्यावयाचे संयुक्त निवेदन त्याकरीता आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह जोडले आहे का ? | ------ | ------ |
| २२. सभासदाची पहिली पत्नी हयात नसेल आणि दुस-यांदा विवाह केला असल्यास दुस-या पत्नीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर केले आहे का ? | ------ | ------ |
| २३. सभासद व त्यांच्या पत्नीमध्ये वयाचे मोठे अंतर असल्यास त्यांचे योग्य स्पष्टीकरण कागदोपत्री सादर करावे. | ------ | ------ |
| २४. जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्या प्रमाणपत्रा अन्वये सभासद स्वतः १०० टक्के अपंग असल्यास परिशिष्ट क्र.१,२,३ सादर केले आहे का ? | ------ | ------ |
| २५. चतुर्थ श्रेणी कर्मचारी वयाची ६० वर्षे पूर्ण होताच निवृत्त होतो, तथापी क.नि.वे.यो. करिता सभासद वयाची ५८ वर्षे पूर्ण होताच पात्र असल्याने त्यांचा पेन्शन प्रस्ताव चेकलिस्ट नुसार या कार्यालयास पाठविला आहे का ? | ------ | ------ |
| २६. सभासदाच्या सेवानिवृत्ती/स्वेच्छा निवृत्ती /बडतर्फीच्या कार्यालयीन आदेशाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| २७. सभासदाची पत्नी/ पती हयात नसल्यास तीच्या/त्याच्या मृत्यु दाखल्याची मुळ (Original) प्रत अथवा घटस्फोटीत असल्यास सक्षम न्यायालयाने घटस्फोट मंजूर केलेल्या आदेशाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| २८. नमुना क्र.१० ड मधील सभासद व त्याच्या कुटुंबीयांची नोंदविलेली माहिती त्याने सादर केलेल्या कागदपत्रांशी सुसंगत आहे का ? | ------ | ------ |
| २९. नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र ८ मध्ये सभासदाचा कायमचा पूर्ण पत्ता व भ्रमणध्वणी क्रमांक (Mobile No.) नमुद केला आहे का ? | ------ | ------ |

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

(जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

| | होय | नाही |
|---|---|---|
| ३०. सभासद या आस्थापनेत रूजू होण्याआधी इतर कुठल्याही आस्थापनेत कार्यरत असल्यास त्याचा सविस्तर तपशिल नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.१५ व १६ मध्ये नमुद करून त्याची कागदपत्रे जोडली आहेत का ? | ------ | ------ |
| ३१. नमुना क्र.१०ड व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड असल्यास सभासदाने त्या ठिकाणी स्वाक्षरी केली आहे का ? | ------ | ------ |
| ३२. सभासदाने नमुना क्र.१० ड चा प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रस्तावाची हाताळणी करतांना बरेचदा नमुना क्र.१०ड चा अर्ज जीर्ण झालेला असतो, अशावेळी नविन अर्ज भरला जातो परंतू प्रस्तावासोबत जुना नमुना क्र.१०ड सदर अर्जाला जोडला जात नाही. तरी दोन्हीही नमुने (जुना नमुना क्र१०ड व नविन नमुना क्र.१०ड )प्रस्तावासोबत जोडले आहेत का ? | ------ | ------ |
| ३३. पेन्शन प्रकरण पाठविण्यास ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास कार्यालयाने/सभासदाने त्याचे सविस्तर लेखी स्पष्टीकरण जोडले आहे का ? | ------ | ------ |
| ३४. नमुना क्र.१० ड सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसणा-या प्रत्येकी दोन साक्षांकित प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ३५. संपूर्ण प्रस्तावाची योग्य प्रकारे छानणी / पडताळणी करुन आवश्यक ठिकाणी सक्षम अधिका-यांच्या सही शिक्क्यानिशी प्रस्ताव सादर केला आहे का ? | ------ | ------ |

---

<u>अत्यंत महत्वाची सुचना</u>

नमुना क्र. १० ड अर्जासोबत जोडलेल्या चेकलिस्ट नुसार पेन्शन प्रस्ताव प्रमाणीत करून या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. तसेच या चेकलिस्ट व्यतिरीक्त क्षेत्रिय भ.नि.नि. आयुक्त कार्यालय, बांद्रा (पूर्व) मुंबई ५१ यांनी दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करणेस कर्मचारी/कार्यालयास बंधनकारक राहील. चेकलिस्टसह त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव न पाठविल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामास संबंधीत कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

सचिव

म.रा.वि.मं., भ.नि.नि. विश्वस्त मंडळ

माटुंगा मुंबई - १९.

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,भविष्य निर्वाह निधी विभाग

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा (पूर्व) मुंबई-१९

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

**(जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)**

| | होय | नाही |
|---|---|---|
| १. नमुना क्र. १० ड अर्जाचे दोन संच (मुळ प्रतीत ) खाडाखोड न करता सुवाच्छ अक्षरात भरलेले आहेत का ? (खाडाखोड असल्यास पेन्शन प्रस्ताव परत पाठविण्यात येतील.) | ------ | ------ |
| २. मयत कर्मचा-याचा पेन्शन प्रस्ताव सादर करताना संपुर्ण प्रस्तावात मयत कर्मचा-याचे व त्यांच्या वारसांचे पुर्ण नाव व जन्मतारीख एकसारखी असल्याची खात्री करुन पेन्शन प्रस्ताव सादर केला आहे का ? | ------ | ------ |
| ३. मयत कर्मचारी अविवाहीत असल्यास सदर पेन्शनसाठी त्यांच्या वडीलांनी अर्ज सादर करावा. वडील हयात नसतील तर त्यांच्या आईने अर्ज सादर करावा व वडीलांच्या मृत्यूच्या दाखल्याची एक मुळ प्रत (Origional Copy) व एक साक्षांकित छायाप्रत जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ४. मयत कर्मचा-याची पत्नी मयत असेल व त्यांना अज्ञान (एकदम लहान) मुले असतील तर पालक म्हणुन कर्मचा-याच्या वडीलांनी अर्ज सादर करावा. जर का कर्मचा-याचे वडील हयात नसतील तर कर्मचा-याच्या आईने अर्ज सादर करावा व कर्मचा-याच्या वडीलांच्या मृत्यूच्या दाखल्याची एक मुळ प्रत (Origional Copy) व एक साक्षांकित छायाप्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ५. मयत कर्मचा-याची पत्नी मयत असल्यास व मुले अज्ञान असल्यास निवृत्ती वेतनाची मागणी पालक (कर्मचा-याचे वडील / आई) यांनी केली असेल तेव्हाअज्ञान मुलाचे बँक खाते पालकांसोबत (अर्जदारासोबत) उघडणे आवश्यक आहे. (Joint A/c) | ------ | ------ |
| ६. मयत कर्मचा-याच्या मृत्यु दाखल्याची एक मुळ प्रत (Origional Copy) व दोन साक्षांकित छायाप्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ७. मयत कर्मचा-याचा जन्मदाखला / शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ८. मयत कर्मचा-याच्या सेवापुस्तीकेतील पहिल्या पानाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ९. नमुना क्र. १०ड मधील रकाना क्र.१२ मध्ये वारस दाखल्यानुसार सर्व वारसांचा उल्लेख करुन त्यांच्या जन्म प्रमाणपत्राच्या / शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या / पॅनकार्ड / ड्रायव्हींग लायसन्स यापैकी एक जन्मतारखेच्या पुराव्याच्या प्रत्येकी दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| १०. मयत कर्मचा-याच्या पत्नी/पती व वय वर्ष २५ च्या आतील अपत्यांचे पासपोर्ट आकाराचे रंगीत एकत्रित छायाचित्र (Group Photo) व स्वतंत्र छायाचित्र (Photo) प्रत्येकी तीन छायाचित्रांच्या मागे मयत कर्मचा-याचा क.नि.वे.क्र. नमुद करून सक्षम अधिकारी यांच्या सही-शिक्क्यानिशी जोडले आहेत का? | ------ | ------ |

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

### (जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)

---

होय नाही

११. कर्मचारी मयत झाल्याच्या तारखेला वय वर्षे २५ च्या आतील मुलींचे विवाह झाले असल्यास नमुना क्र. १० ड मधील मुद्दा क्र. १२ व मुद्दा क्र. १४ मध्ये तसेच नमुना हस्ताक्षर प्रपत्रावर सासरच्या नावाने नोंद करून त्या सोबत विवाह नोंदणी दाखले जोडले आहेत का ? (विवाह नोंदणी दाखले स्थानिक स्वराज्य संस्थामधील उदा. ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका) किंवा न्यायालयामधील सादर करावेत. ------ ------

१२. क्षेत्रिय भविष्य निधी कार्यालयाने खालील निर्देशित केलेल्या कोणत्याही बँकेतील एकाच शाखेत मयत कर्मचा-याच्या पत्नी /पती व त्यांची वय वर्ष-२५ च्या आतील अपत्यांचे स्वतंत्र पेन्शन खाते उघडून पेन्शन बँकखाते पुस्तिकेतील पहिल्या पानाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? ------ ------
**(SBI Bank, Bank of India, Axis Bank, ICICI Bank, HDFC Bank, Punjab National Bank)**

१३. मयत कर्मचा-याच्या वय वर्ष २५ च्या आतील विवाहीत मुलींनी त्यांचे स्वतंत्र बँकखाते त्यांच्या सासरच्या नावाने उघडले आहे का ? ------ ------

१४. मयत कर्मचा-याच्या वारसांच्या नावात तफावत असल्यास महाराष्ट्र शासनाचे राजपत्र (Gazzet) सादर करावे व नमुना क्र. १० ड मधील हस्ताक्षर नमुना नविन नावाने सादर करून नविन नावानेच बँक खाते उघडले आहे का ? ------ ------

१५. मयत कर्मचा-याची डिसेंबर -१९९५ पर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज आणि जानेवारी -१९९६ पासून सभासदाच्या सेवासमाप्तीपर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज बिनपगारी रजेच्या तक्त्यात वेगवेगळी दाखविलेली आहे का ? ------ ------

१६. मयत कर्मचारी रोजंदारी कामगार (NMR) असल्यास त्याचा रोजंदारी कामगार असल्या पासूनचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? ------ ------

१७. कर्मचा-याचा मृत्यु होण्या आधीच्या १२ महिन्याच्या पगाराचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडलेला आहे का ? (पगाराचा तपशिल महिनावार क.नि.वे.च्या कपात व रोख प्रमाणक क्र.व दिनांकासह लेखापरिक्षीत करून सादर करावा) ------ ------

१८. कर्मचा-याच्या मृत्यु होण्या आधीच्या १२ महिन्याच्या कालावधीत एकत्रित पुरवणी पगार दिला गेला असल्यास त्याचे महिनावार विवरणपत्र क.नि.वे. कपातीसह लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? ------ ------

१९. तहसिलदाराने / कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेला वारसाचा दाखला/ लिगल हेअर सर्टिफिकेट / कोर्टाचे सक्सेशन सर्टिफिकेट जोडले आहे का ? ------ ------

२०. कर्मचारी हरवलेल्या प्रकरणात पोलीस स्टेशनमध्ये (F.I. R.) दाखल केल्याची प्रत जोडावी त्यासबंधी संबंधीत न्यायालयाचा निर्णय अंतीम राहील. त्या अंतीम निर्णयाची प्रत तसेच न्यायालयाचे आदेशाप्रमाणे मिळालेल्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत (Origional Copy) व एक साक्षाकींत छायाप्रती जोडल्या आहेत का ? ------ ------

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)
### (जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)

| | होय | नाही |
|---|---|---|
| २१. मयत कर्मचा-याच्या स्वतंत्र कुटुंबाची यादी सादर करतांना विहीत नमुन्यात सर्व वारसांची नावे वारस दाखल्यानुसार नमुद करावी व जन्मतारखा नमुद करून दोन प्रतीत साक्षांकीत करून जोडली आहे का ? | ------ | ------ |
| २२. क.नि.वे. योजना १९९५ चा फॉर्म एफ -२ (पेन्शन नॉमिनेशन ) सादर करताना विहीत नमुन्यात सर्व वासांची नावे वारस दाखल्यानुसार नमुद करुन जन्मतारखा नमुद कराव्यात सदर फॉर्म कार्यालयीन साक्षांकनासहीत दोन प्रतीत सादर केला आहे का तसेच अंतिम भ.नि.नि.प्रदान केल्याची प्रत जोडली आहे का ? | ------ | ------ |
| २३. नमुना क्र.१०ड मधील रकाना क्र.१७ वर अर्जदाराने स्वाक्षरी केली आहे का ? | ------ | ------ |
| २४. नमुना क्र.१० ड मधील नमुना हस्ताक्षर प्रपत्रावर मयत कर्मचा-याच्या पात्र वारसांनी प्रत्येकी एकूण १० स्वाक्ष-या केल्या आहेत का ? आणि सक्षम अधिका-यांचे साक्षांकन केले आहे का ? | ------ | ------ |
| २५. मयत कर्मचा-याची पत्नी हयात नसेल तर तिचे मृत्यु दाखल्याची मुळ प्रत (Origional Copy) व एक साक्षाकींत छायाप्रत जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| २६. मयत कर्मचा-याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असल्यास त्या प्रत्येकीचे विवाह नोंदणी दाखले जोडले आहेत का ? (विवाह नोंदणी दाखला स्थानिक स्वराज्य संस्थामधील उदा. ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, ) किंवा न्यायालयामधील सादर करावेत. | ------ | ------ |
| २७. मयत कर्मचा-याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असल्यास त्यापैकी पहिल्या विवाहीत पत्नीने कर्मचारी वेतन योजनेसाठी अर्ज केला आहे का ? | ------ | ------ |
| २८. मयत कर्मचा-याची पहिली पत्नी मयत असल्यास / घटस्फोट दिला असल्यास तिच्या मृत्यू दाखल्याची एक मुळ प्रत (ओरीजिनल) किंवा घटस्फोट दिल्याबद्दल न्यायालयाची अंतिम आदेशाची प्रत जोडली आहे का ? | ------ | ------ |
| २९. मयत कर्मचा-याची पहिली पत्नी मयत अथवा घटस्फोट दिला असल्यास दुस-या पत्नीने पेन्शनचा अर्ज सादर केला असल्यास तिचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का ? (विवाह नोंदणी दाखला स्थानिक स्वराज्य संस्थामधील उदा. ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, ) किंवा न्यायालयामधील सादर करावेत. | ------ | ------ |
| ३०. मयत कर्मचा-याच्या भ.नि.नि. नामनिर्देशनाची प्रत जोडली आहे का ? | ------ | ------ |
| ३१. कर्मचा-याचा मृत्यु होण्याआधी सेवानिवृत्ती/स्वेच्छा निवृत्ती /बडतर्फी झाली असल्यास कार्यालयीन आदेशाच्या दोन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ३२. कर्मचा-याचा मृत्यु होण्याआधी सेवेतून शिक्षा म्हणून निलंबित करुन पुन्हा कामावर रुजू केले असल्यास तसा न्यायालयाच्या अंतिम आदेशाची प्रत व कार्यालयात पुन्हा रजू केल्याचा आदेशाची प्रत सादर केली आहे का ? | ------- | ------ |

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

**(जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)**

---

| | होय | नाही |
|---|---|---|
| ३३. कर्मचा-याचा मृत्यु होण्याआधी सेवेतून शिक्षा म्हणून निलंबित करुन पुन्हा कामावर रुजू केले असल्यास सदर शिक्षा म्हणून दिलेल्या कालावधीत EPS, CPF कपात केली जात नाही व निलंबित कालावधीचा कंपनीचा हिस्सा दिला जात नाही त्याबाबतची कार्यालयीन आदेशाची प्रत जोडली आहे का ? | ------ | ------ |
| ३४. नमुना क्र.१० ड मधील शेवटच्या पानावरील आस्थापनाचे मालक/ नियुक्त अधिकारी म्हणून संबधीत सक्षम अधिका-याने स्वाक्षरी केली आहे का ? | ------ | ------ |
| ३५. नमुना क्र.१० ड मधील मयत कर्मचा-याच्या वारसांनी नोंदविलेली माहिती त्याने सादर केलेल्या कागदपत्रांशी सुसंगत आहे का ? | ------ | ------ |
| ३६. नमुना क्र. १० ड मधील रकाना क्र ८ मध्ये मयत कर्मचा-याच्या वारसाचा कायमचा पूर्ण पत्ता व भ्रमणध्वणी क्रमांक (Mobile No.) नमुद केला आहे का ? | ------ | ------ |
| ३७. मयत कर्मचारी या आस्थापनेत रूजू होण्याआधी इतर कुठल्याही आस्थापनेत कार्यरत असल्यास त्याचा सविस्तर तपशिल नमुना क्र.१०ड मधील रकाना क्र.१५ व १६ मध्ये नमुद करून त्याची कागदपत्रे जोडली आहेत का ? | ------ | ------ |
| ३८. मयत कर्मचारी मंडळाच्या सेवेत वयाच्या तिस वर्षानंतर उशिरा सेवेत रुजू झाला असल्यास त्याचे योग्य ते स्पष्टीकरण व कागदोपत्री पुरावा सादर करावा. | ------ | ------ |
| ३९. मयत कर्मचा-याचा वारसांपैकी कोणी अपंग असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon) यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे का ? | ------ | ------ |
| ४०. मयत कर्मचा-याच्या वारसाने नमुना क्र. १० ड चा प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रस्तावाची हाताळणी करतांना बरेचदा नमुना क्र.१०ड चा अर्ज जीर्ण झालेला असतो, अशावेळी नविन अर्ज भरला जातो परंतू प्रस्तावा सोबत जुना नमुना क्र.१०ड अर्ज जोडला जात नाही. तरी दोन्हीही नमुने (जुना नमुना क्र. १०ड व नविन नमुना क्र. १०ड) प्रस्तावासोबत जोडले आहेत का ? | ------ | ------ |
| ४१. नमुना क्र.१०ड व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड असल्यास अर्जदाराने त्या ठीकाणी स्वाक्षरी केली आहे का ? | ------ | ------ |
| ४२. पेन्शन प्रकरण पाठविण्यास ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास कार्यालयाने मयत कर्मचा-याच्या वारसाने त्याचे सविस्तर स्पष्टीकरण जोडले आहे का ? | ------ | ------ |
| ४३. नमुना क्र.१० ड सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसणा-या प्रत्येकी दोन साक्षांकित प्रती जोडल्या आहेत का? | ------ | ------ |

# नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

## (जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)

| | होय | नाही |
|---|---|---|
| ४४. मयत कर्मचा-याचे नमुना क्र. १० ड वर नमुद केलेले नाव आणि जोडलेल्या इतर कागदपत्रांवरील पुर्ण नाव व पुर्ण नावातील स्पेलिंग यामध्ये तफावत असल्यास ख-या नावासाठी सादर करावयाचे संयुक्त निवेदन त्याकरीता आवश्यक असणा-या कागदोपत्री पुराव्यांसह जोडले आहे का ? | ------ | ------ |
| ४५. क्षेत्रिय भ.नि.नि. कार्यालयाच्या आदेशानुसार पेन्शन प्रस्तावासोबत **E.D.L.I. (Employee Deposit Linked Insurance Scheme 1976)** चा परिपुर्णरित्या भरलला फॉर्म जोडला आहे का ? | — | — |
| ४६. संपूर्ण प्रस्तावाची योग्य प्रकारे छानणी / पडताळणी करुन आवश्यक ठिकाणी सक्षम अधिका-यांच्या सही शिक्क्यानिशी प्रस्ताव सादर केला आहे का ? | ------ | ------ |

**अत्यंत महत्वाची सुचना**

नमुना क्र. १० ड अर्जासोबत जोडलेल्या चेकलिस्ट नुसार पेन्शन प्रस्ताव प्रमाणीत करून या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. तसेच या चेकलिस्ट व्यतिरीक्त क्षेत्रिय भ.नि.नि. आयुक्त कार्यालय, बांद्रा (पूर्व) मुंबई ५१ यांनी दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करणेस कर्मचारी/कार्यालयास बंधनकारक राहील. चेकलिस्टसह त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव न पाठविल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामास संबंधीत कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

राऊपवार

सचिव
म.रा.वि.मं., भ.नि.नि. विश्वस्त मंडळ
माटुंगा मुंबई - १९.